# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**


**दिनांक १९.०८.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या ईसमाविरूध्द चालान कारवाई.**

दिनांक १८.०८.२०२६ चे २३.३५ वा. चे सुमारास, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, गोरेवाडा, नटराज सोसायटी येथील मयुर पान पॅलेस येथे पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, तेथे शासनाने प्रतीबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा वेगवेगळे फ्लेवरचा तंबाखु, पानमसाला, तंबाखु पाऊच असा मुद्देमाल मिळुन आला. शॉप मधिल ईसमास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव सचिन दिनेश्वर शर्मा, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. ११, नटराज सोसायटी, गोरेवाडा, नागपुर असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन गोल्डन सफारी, विमल, जनम, रजनीगंधा, राजश्री, मुसाफीर नावाचे वेगवेगळया कंपनीचे पानमसाला व तंबाखु पाऊच एकुण किंमती अंदाजे ९,६७७/—रू. चा मुद्देमाल तसेच, तंबाखु व पानमसाला विक्रीतुन मिळालेले रोख ४०,१९०/—रू. असा एकुण ४९,८६७/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. सरतर्फे फिर्यादी नापोअं. विजय यादव, पो.ठाणे मानकापुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. अमित बंडगर यांनी आरोपीविरूध्द कलम २२३, २७४, २७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a),३(१)(iv)(zz) अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह मानकापुर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. अमित बंडगर, पोहवा. विजय गिरी, आशिष गायधने, मनोज निमकर, दिनेश क्षिरसागर, संतोष कदम व मपोअं. श्वेता पाटील यांनी केली.



**२) गुन्हेशाखा युनिट क्र. २  पोलीसांची कामगिरी :— जिवे मारण्याच्या उद्देशाने अपघात करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ११.०८.२०२६ चे २३.३० वा. ते २३.४० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत, हॉटेल मेमोरेझ समोरील रोडवर सोमलवाडा चौक येथुन शेख अकरम उर्फ भुरू शेख रेहमान, वय ४२ वर्षे, रा. आनंद नगर, सिताबर्डी, नागपुर हा जात असतांना, त्यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने एका चारचाकी वाहनाचे चालकाने धडक मारून गंभीर जखमी करून पळुन गेला होता. जखमी यास उपचाराकरीता दाखल करण्यात आले होते. याप्रकरणी पोलीस ठाणे सोनेगांव येथे आरोपीविरूध्द कलम ६१, १०९, २८१, १२५(अ), १२५(ब) भा.न्या. सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, तसेच, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, जखमी यास जुन्या वैमनस्यावरून यातील आरोपींनी कट रचुन, जखमी हा घटनास्थळाहुन जात असतांना, त्यांचे ताब्यातील जिप कंपास केपनीचे चारचाकी वाहनाने शेख अकरम यास धडक देवुन गंभीर जखमी केल्याचे निष्पन्न केले. आरोपींचा शोध घेवून क्र. १) शहबाज खान उर्फ सलमान बिल्ला अहमद खान, वय २५ वर्षे, रा. ताजनगर, मानकापुर २) अमीर बशीर शेख, वय ३५ वर्षे, रा. झिंगाबाई टाकळी, मानकापुर ३) मोहम्मद साहील अन्सारी मोहम्मद अल्ताफ अन्सारी, वय २८ वर्षे, रा. न्यु पार्वती नगर, कळमना, ४) मोहम्मद तौफीक शेख मोहम्मद आरीफ, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. ३८९, सिताबर्डी, नागपुर, ५) शेख शरीफ शेख सलीम, वय ३६ वर्षे, रा. तेलीपुरा, बुरडगल्ली, सिताबर्डी, नागपुर यांना ताब्यात घेतले. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरलेली चारचाकी वाहन किंमती १५,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह सोनेगांव पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपी नामे शेख मोहसिन उर्फ बाबा टायगर शेख, वय २७ वर्षे, रा. ताजनगर, मानकापुर यांचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. शुभांगी देशमुख, सपोनि. चेतन बोरखेडे, पोउपनि. मनोज राऊत, सफौ. गजेंद्रसिंग ठाकुर, पोहवा. नरेश तुमडाम, विजय यादव, अर्जुन यादव, कमलेश गणेर, मनिष टोंगे, पोअं. मंगल जाधव, आशिष धंदरे, संदीप पांडे, विवेक श्रीपाद व प्रविण चव्हाण यांनी केली.




**४) गुन्हेशाखा युनिट क्र. ५  पोलीसांची कामगिरी :— कलम १२४ म.पो.का. अन्वये मुद्देमाल जप्त.**

दिनांक १७.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १८.०८.२०२६ चे ००.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार यांनी त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, जय महाराष्ट्र मुव्हर्स वाडी—भंडारा फ्रेड कॅरीयर येथे कंटेनर क्र. आरजे ११ जिडी १५४६ ची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये लोखंडी अल्युमिनीयम व मिश्र धातुचे साहीत्य एकुण वजनी १२ टन ४०० किलो वजनी मिळुन आले. मालाबाबत १) गणेश मेटल्सचे गजानन घनशामजी महाजन, वय ६२ वर्षे, रा.

मनिष नगर, सोमलवाडा, २) जगदंबा मेटल्सचे जयंतकुमार चंद्रमोहनजी बरवाड, वय ५२ वर्षे, रा. कासारपुरा गल्ली, तिननल चौक, ३) मोहम्मद अफराज फिरोज शेख, वय २७ वर्षे, रा. पाटीलपुरा, संदेश दवा बाजार, गणेशपेठ ४) मोहम्मद युसुफ मोहम्मद हनिफ, वय ५८ वर्षे, रा. रामसुमेरबाबा नगर, शांतीनगर यांना आवश्यक कागदपत्रे मागीतली असता, त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाही. आरोपी हे नमुद मुद्देमाल हा अवैद्यरित्या प्राप्त करून, कंटेनरमध्ये लोड करून, दिल्ली येथे पाठविण्याच्या तयारीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन कंटेनरसह मिश्र धातु एकुण किंमती ६१,६४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. फिर्यादी पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपींविरूध्द कलम १२४ म.पो.का. अन्वये कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास लकडगंज पोलीस करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, पोहवा. भगवतीकुमार ठाकुर, अभिषेक शनिवारे, देवेंद्र नवघरे, प्रकाश राजपल्लीवार यांनी केली.



**<u>५) अजनी पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०८.२०२६ चे २३.२० वा. ते दिनांक १९.०८.२०२६ चे ०१.३० वा. चे दरम्यान, अजनी पोलीसांचे पथकाने मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, नाईक नगर, द गॅलक्सी सलुन चे पहील्या माळ्यावर पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) दामोदर हेमराज कुहीकर, वय ६४ वर्षे, रा. जुनी मंगळवारी, गुजरी चौक, २) मोहम्मद आसिफ मोहम्मद शागीर, वय ३५ वर्षे, रा. जैन मंदीर जवळ, हिंगणघाट ३) बलविर कृपाराव बंबोरे, वय ४८ वर्षे, रा. आर्य नगर, कोराडी, ४) कैलास महादेवराव थोटे, वय ४७ वर्षे, रा. गरोबा मैदान, हनुमान चौक, लकडगंज, ५) सुधाकर लक्ष्मण वंजारी, वय ५३ वर्षे, रा. आदर्श नगर, नंदनवन ६) आदीत्या राजेंद्र नाईक, वय २८ वर्षे, रा. वसंत नगर, अजनी, ७) जितेंद्र चंद्रशेखर पाठक, वय ४८ वर्षे, रा. नेताजी वार्ड, हिंगणघाट, ८) विजय रामकृष्ण मिशारकर, वय ४४ वर्षे, रा. उंगळी वार्ड, हिंगणघाट ९) आसिफ मोहम्मद ताहीर, वय ३८ वर्षे, रा. गुजरी बाजार, कामठी, १०) साजीद खान शमीउल्ला खान, वय ४६ वर्षे, रा. मलंगशहा दर्गाह जवळ, हिंगणघाट, ११) अमित मनोहरराव बुरड, वय ४८ वर्षे, रा. मिलींद नगर, हिंगणघाट, १२) जयकुमार रमेश बंशीवाल, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. १७६, त्रीमर्ती नगर, १३) मनोज ज्ञानचंद जैन, वय ६२ वर्षे, रा. प्लॉट नं. ३००/ डी, विएमवी कॉलेज जवळ, वर्धमान नगर, १४) मुकेश किशोर डेहरीया, वय ३३ वर्षे, रा. वसंत नगर, अजनी १५) विक्की विलास अहीरराव, वय ३० वर्षे, रा. सुंदर नगर,

पारडी, नागपुर हे ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख १,३००/–रू., वेगवेगळ्या रंगाचे व रकमेचे प्लास्टीक कॉईन, ०१ की–पॅड, ०२ लेनोवा कंपनीचे टॅब, वेगवेगळ्या कंपनीचे ११ मोबाईल फोन, दुचाकी वाहन, चारचाकी वाहन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण ८,०५,८००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, पोउपनि. सिध्दांत मस्के, पोहवा. मनोज, शालकराम शेंडे, प्रकाश, नितीनकुमार, प्रविण, पोअं. अतुल व मपोअं. रेखा यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे यशोधरानगर :–शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १९.०८.२०२६ चे ०३.०५ वा. ते ०३.५५ वा. चे दरम्यान, यशोधरानगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, पंचवटी ग्राऊंड जवळ, यशोधारानगर येथे एका पांढरे रंगाचे पल्सर मोटारसायकल वरील इसम पोलीसांना पाहुन पळु लागल्याने त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अक्षय उर्फ बुंदी शामसुंदर गुरवे, वय २१ वर्षे, रा. धम्मदीप नगर, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी चाकु मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती १,०००/–रू. व पल्सर वाहन क्र. एम. एच. ४९ सिजे. १३९४ असा एकुण १,०१,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे धंतोली :– चोरी करणाऱ्या नोकर आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, प्लॉट नं. १२, प्रगती कॉलोनी, छत्रपती चौक, वर्धा रोड, नागपुर येथे फिर्यादी नरेंद्र बाबुराव पटले, वय ४९ वर्षे, रा. मातोश्री नगर, हिंगणा रोड, नागपुर यांचे हॅण्डलुम हब हाऊस चे ऑफीस असुन फिर्यादीचा वेगवेगळ्या प्रदर्शनीमध्ये हॅण्डलुम कपडे व ईतर वस्तु विक्रीसाठी प्रदर्शनी लावण्याचा व्यवसाय आहे. प्रदर्शनीमध्ये बिल जमा करणे व ईतर व्यवहाराकरीता आरोपी अंकीत मंगल, वय ३८ वर्षे, रा. सिकरदरा, बोघारा, आग्रा (उत्तर प्रदेश) हा नोकर म्हणुन कामाला होता. दिनांक १६.०८.२०२६ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. चे दरम्यान, आरोपीने फिर्यादीचे हॅण्डलुम ऑफीसमधील लोखंडी कपाटात बॅगमध्ये ठेवलेले रोख ५,५०,०००/–रू. व हिशोबाचे रजीस्टर चोरी करून घेवुन गेला. फिर्यादी यांनी सिसिटीव्ही कॅमेरे चेक केले असता, आरोपी चोरी करतांना दिसला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि. प्रिती पटले ८३२९३६९८२६ यांनी आरोपीविरूध्द कलम ३०६ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

# <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट</u>

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील वाहतुक व्यवस्था सुरळीतपणे पार पाडण्यासाठी वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरूद्ध सातत्याने कारवाई करण्यात येते. वाहतूक नियमांचे पालन करणे अपघातांना आळा घालने तसेच, रस्त्यावरील शिस्त कायम ठेवणे या उद्येशाने ही कारवाई करण्यात येते.

माहे जानेवारी २०२६ ते जुलै २०२६ या कालीवधीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकुण **४,९७,५१२** चालकांविरूद्ध चालान कारवाई करून, त्यादरम्यान सर्व वाहतुक परिमंडळ हद्दीत विशेष मोहीम राबवुन एकुण **५,४५,२२,१५०/—**रू. ची प्रलंबीत चालान दंड वसुली करण्यात आली.

| अ.क्र. | महिना अखेर | चालान कारवाई | वसूल केलेली प्रलंबित दंड रक्कम |
|---|---|---|---|
| १ | जानेवारी २०२६ | ५४,६९३ | ८१९५५००/— |
| २ | फेब्रुवारी २०२६ | ५३,७८६ | ८१२५८००/— |
| ३ | मार्च २०२६ | ५५,२६२ | ७३४०३००/— |
| ४ | एप्रिल २०२६ | ७३,३१४ | ७८७८१००/— |
| ५ | मे २०२६ | ९४,३०१ | ७६५५७५०/— |
| ६ | जुन २०२६ | ७९,८४१ | ७२१५८५०/— |
| ७ | जुलाई २०२६ | ८६,३१५ | ८११०८५०/— |
| | **एकूण** | **४,९७,५१२** | **५४५२२१५०/—** |

प्रलंबित वाहतूक दंडाची रक्कम वसुली करण्याकरीता प्रलंबित ई—चलान असलेल्या वाहनधारकांना/ वाहनमालकांना उपलब्ध नोंदीनुसार नोटीस बजावण्यात आल्या. विविध पथकांमार्फत वाहन तपासणी करताना प्रलंबित ई—चलान असलेल्या वाहनांची तपासणी करून, प्रलंबित दंडाची वसुली करण्यात आली आहे. नियमित नाकाबंदी, वाहन तपासणी व वाहतूक नियमांच्या अंमलबजावणी दरम्यान प्रलंबित ई—चलान असलेल्या वाहनांची पडताळणी व उपलब्ध ई—चलान प्रणालीतील प्रलंबित प्रकरणांचे विश्लेषण करून वसुलीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली आहे.

**(आदित्य मिरखेलकर, भापोसे)**
पोलीस उप आयुक्त वाहतुक,
नागपुर शहर.